आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२५ सप्टेंबर २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- मराठा समाजाला केवळ आरक्षण देऊन प्रश्न सुटणार नाहीत, त्यामुळे या समाजासाठी विविध योजना सुरू केल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- राज्यातल्या पूरग्रस्तांसाठी केंद्रसरकारकडून विशेष पॅकेज मिळवून देण्याचं केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचं आश्वासन

- स्वदेशनिर्मित अग्नी प्राईम क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी

आणि

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यातला भारताचा प्रतिस्पर्धी आज ठरणार

**<><><><><>**

नोकऱ्या मोठ्या प्रमाणात नसल्यामुळे मराठा समाजाला केवळ आरक्षण देऊन प्रश्न सुटणार नाहीत, त्यामुळे मराठा समाजासाठी विविध योजना सुरू केल्या, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. माथाडी कामगार नेते अण्णासाहेब पाटील यांच्या ९२ व्या जयंतीनिमित्त आज नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात माथाडी कामगारांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहं उभारण्यात आली आहेत, सारथी संस्थेमार्फत स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेतली जात आहे, अण्णासाहेब पाटील महामंडळाला आर्थिक सहाय्य देऊन ते मजबूत करण्यात आलं, मराठा समाजातील तरुणांना उद्योगासाठी आर्थिक मदत दिल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

अण्णासाहेब पाटील यांनी निस्वार्थपणे जनतेची सेवा केली. माथाडी कामगारांसाठी संघटना उभी केली, त्यांच्यासारखे नेते दुर्मिळ असतात, असं मुख्यमंत्री म्हणाले. माथाडी कामगारांची चळवळ मजबूत करण्यासाठी आवश्यक ती मदत करण्याचं आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं.

**<><><><><>**

राज्यातल्या पूरग्रस्त भागात पाहणी करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाचे सदस्य वरिष्ठ अधिकारी, आणि लोकप्रतिनिधी दौरे करत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बीड दौऱ्याची सुरुवात मौजे पिंपळगाव घाटपासून केली. त्यानंतर त्यांनी मौजे खोकरमोहा इथं फुटलेल्या तलावाची पाहणी केली

आणि नुकसानीचा आढावा घेतला. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असून, सर्व ती मदत केली जाईल, असं आश्वासन पवार यांनी यावेळी दिलं.शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी हिंगोली जिल्ह्यात कनेरगाव आणि अंबाळा इथं नुकसानग्रस्त शेतीची पाहणी केली. नांदेड जिल्ह्यात जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी पूर परिस्थितीची पाहणी केली. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आणि इतर लोकप्रतिनिधी पूरग्रस्त भागात जाऊन आपद्‌ग्रस्तांची विचारपूस करत आहेत.

<><><><><>

राज्यातल्या पूरग्रस्तांसाठी केंद्र सरकारकडून विशेष पॅकेज मिळवून देण्याचं आश्वासन आज केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी दिलं. धाराशिव जिल्ह्यात पूरग्रस्त भागाची पाहणी करताना ते बोलत होते. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे करु, आपद्‌ग्रस्तांना आणखी मदत मिळणं गरजेचं असून त्याकरता केंद्रसरकारकडून राज्याला विशेष मदतीचं पॅकेज मिळवून देण्याचा प्रयत्न करु असं आश्वासन त्यांनी दिलं. संबंधित क्षेत्रातल्या शेतकऱ्यांची कर्जं माफ करावी असं आपण बँकाना सांगणार असून, खासगी कंपन्यांनी या भागतल्या जिल्ह्यांना दत्तक घ्यावं, असं आवाहन त्यांनी केलं. आठवले यांनी आज पूरग्रस्त शेतकऱ्यांशी संवादही साधला.

<><><><><>

मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे पिकांचं मोठं नुकसान झालं असून, सरकारने शेतकऱ्यांना प्रति हेक्टर पन्नास हजार रुपये मदत द्यावी, अशी मागणी काँग्रेस विधीमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ते आज नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. शेतकऱ्यांना मदत करण्याची सरकारची इच्छा नाही, फक्त आश्वासनं दिली जात आहेत, अशी टीका त्यांनी केली. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी ६ महिन्यांचं वेतन मुख्यमंत्री सहायता निधीला देणार असल्याचं सांगून त्यांनी सर्वपक्षीय आमदारांनी वेतन द्यावं, असं आवाहन केलं.

<><><><><>

पाम तेलाचं जागतिक अर्थव्यवस्थेत तसंच आरोग्य आणि पोषणातलं स्थान या विषयावर उद्या मुंबई विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिसंवाद होत आहे. ‘मलेशियन पाम ऑइल कौन्सिल’च्या सहकार्याने ‘ऑईल टेक्नॉलॉजी असोशिएशन ऑफ इंडिया’च्या पश्चिम विभागाच्या सहकार्यानं मुंबई विद्यापीठ आणि इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीनं संयुक्तपणे या परिसंवादाचं आयोजन केलं आहे.

<><><><><>

देशातल्या तरुणांना सक्षम बनवण्यासाठी केंद्र सरकारनं अनेक धोरणं आखली आहेत. आजच्या सेवा पर्व या विशेष मालिकेत जाणून घेऊ या संरक्षण उत्पादन क्षेत्राविषयी….

**व्हीसी----**

*(संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर होणं याला केंद्र सरकारचं प्राधान्य आहे. ऑपरेशन सिंदूर दरम्यान संरक्षण क्षेत्रातल्या आत्मनिर्भरतेचं प्रत्यंतर आलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याबद्दल म्हणाले.....*

**होल्ड- बाईट- मोदी**

*सन २०२४-२५ मधे वार्षिक संरक्षण उत्पादन एक लाख ५० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झालं. धोरणात्मक बदल, व्यवसायात आलेली सुलभता, आणि स्वदेशीवर दिलेला भर यामुळे खासगी आणि सरकारी संरक्षण उत्पादन क्षेत्रात सातत्यानं वाढ होत आहे. मेक इन इंडिया हे धोरण देशाच्या संरक्षणासाठी महत्त्वाचं ठरलं असून पाकिस्तानविरुद्धच्या ऑपरशेन सिंदूरमधे याचा फायदा झाला. संरक्षण क्षेत्रातल्या आत्मनिर्भरतेमुळे निर्यातीत वाढ झाली असून संरक्षण क्षेत्रात भारत जागतिक पातळीवर आपला ठसा उमटवत आहे.)*

**<><><><><>**

स्वदेशनिर्मित अग्नी प्राईम क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी झाली आहे. डी आर डी ओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं विकसित केलेल्या या अत्याधुनिक क्षेपणास्त्राचा पल्ला २ हजार किलोमीटरचा असून रेल्वेमार्गावर चालत्या प्रक्षेपण यंत्रणेद्वारे प्रक्षेपित होणारं हे पहिलंच क्षेपणास्त्र आहे. फिरत्या यंत्रणेमुळे हे क्षेपणास्त्र कोणत्याही प्रकारच्या पृष्ठभागावरून, कमी प्रकाशात आणि त्वरित प्रक्षेपित करता येणार आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी ही चाचणी यशस्वी झाल्याबद्दल डी आर डी ओ, स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड आणि सैन्यदलाचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

जागतिक पातळीवर अनेक आव्हानं आणि अनिश्चित वातावरण असूनही भारताची विकास वाटचाल लक्षणीय असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. उत्तरप्रदेशात ग्रेटर नॉयडा इथं आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्याचं उद्घाटन करताना आज ते बोलत होते.

सरकारच्या जेम पोर्टलवर सुमारे २५ लाख वस्तू आणि सेवा पुरवठादार विक्री करत आहेत तसंच युपीआय, आधार, डिजिलॉकर, अशा अनेक सुविधा उद्योजक आणि व्यावसायिकांना उपलब्ध आहेत.

येत्या सोमवारपर्यंत चालणाऱ्या या मेळ्यात उत्तर प्रदेशातल्या विविध हस्तकला परंपरा, आधुनिक उद्योग, सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग तसंच उदयोन्मुख उद्योजक एकाच व्यासपीठावर एकत्र आले आहेत.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा करांमध्ये केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या. याअंतर्गत जीएसटीचा १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा रद्द झाला असून फक्त ५ आणि १८ टक्के अशा दोन टप्प्यांमध्येच जीएसटी आकारला जात आहे. बांधकाम क्षेत्रातल्या जीएसटी दरांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून….

**व्हीसी----**

*(जीएसटी दर सुधारणेमुळे ग्राहक आणि उद्योग दोघांनाही मोठा फायदा होणार आहे. नव्या कररचनेनुसार वाळू आणि चुनखडीच्या विटांवरील जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्के करण्यात आला आहे. या विटांचा वापर घरांच्या बांधकामासाठी विशेषतः ग्रामीण भागात केला जातो. यावरला जीएसटी कमी झाल्यामुळे त्यांचे दरही कमी होणार आहेत. यामुळे घर बांधण्यासाठी कमी खर्च येईल. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागात पक्की घरं बांधण्याचं प्रमाण वाढेल. सर्वांसाठी पक्की घरं बांधण्याच्या सरकारच्या मोहिमेसाठी हे फायद्याचं ठरणार आहे. वीटभट्ट्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाद्वारेच चालवल्या जातात. विटांवरील कर कमी झाल्यामुळे या उद्योगांना कमी भांडवली गुंतवणूक करावी लागेल. ग्राहकांकडून मागणी वाढल्यानं त्यांचा खप वाढेल. यामुळे या उद्योगांना नफा मिळेल आणि त्यांच्या वाढीस पोषक वातावरण तयार होईल.)*

**<><><><><>**

'स्वच्छता ही सेवा' या सध्या सुरु असलेल्या मोहिमेत आज पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता दिन साजरा होत आहे. **संरक्षणमंत्री राजनाथ सिंग** यांनी नवी दिल्ली इथं संरक्षण मुख्यालयात सफाई कर्मचाऱ्यांना सन्मानित केलं.  केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्र**तापराव जाधव** यांनी निर्माण भवन इथं स्वच्छता मोहिमेत भाग घेतला. स्वच्छता ही सेवा अभियानाअंतर्गत आज ठिकठिकाणी एक दिवस  एक तास एकसाथ उपक्रम राबवून स्वच्छता

करण्यात आली.आकाशवाणी मुंबईच्या प्रसारण भवनात झालेल्या स्वच्छता अभियानात कार्यालय प्रमुखांसह वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगाने मतमोजणी प्रक्रियेत सुधारणा केली असून यानुसार आता ईव्हीएमवरच्या मतमोजणीच्या शेवटच्या दोन टप्प्यांपूर्वी टपाली मतदानाची मोजणी केली जाणार आहे. टपाली मतदानाची संख्या जास्त असल्यास त्यांची मोजणी वेळेत पूर्ण व्हावी म्हणून पुरेसे कर्मचारी नियुक्त करणं ही संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांची जबाबदारी असेल.

**<><><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या सुपर फोर फेरीत बांगला देशवर विजय मिळवून भारताने अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. बांगलादेश - पाकिस्तान दरम्यान आज होणाऱ्या सामन्यात भारताविरुद्धचा अजिंक्यपदाचा प्रतिस्पर्धी ठरेल.

//<><><><><>//